CCI was split on Jio interim order

KIRAN RATHEE & VEENA MANI
New Delhi, 15 May

In the decision reported last week of the Competition Commission of India (CCI) taking a majority view that there is cartelisation by incumbents Vodafone, Airtel and Idea in the telecom sector, two of its members believe there is no such case.

The interim CCI order had directed a detailed probe in this regard by its director-general against the major incumbents for allegedly trying to block the entry of Reliance Jio into the segment.

However, the two members have said Reliance Jio is to blame, not the others. *Business Standard* has reviewed the order, and the two members have said Jio's complaint is not justified. The reasoning is that Jio is still in its trial phase, not marketing the product commercially. and, as Jio's users aren't being charged for the period under review, they are not subscribers.

They have noted test cards "are to be issued to business associates, employees, relations, etc, only for the purpose of checking the quality of service. This does not seem to be the case with R-Jio. Thus, the alleged non-provisioning of demand of POIs (points of interconnections) by the telecom operators or reasonability of demand needs to be seen in this light".

Also, that the demand of POIs by Reliance is not reasonable, as only a certain number of free cards could be distributed during the test phase. And, so, that Reliance is responsible for congestion in its network, more so than any other player.

Jio had also contented that the incumbents were not allowing Mobile Number Portability to those who wished to come over to its system. The dissenting members say there is no evidence to prove concerted efforts in this regard by the incumbents.

CPPIB, IndoSpace in $1.3-bn deal

RAGHAVENDRA KAMATH
Mumbai, 15 May

In the largest private equity deal in the logistics space, the Canadian pension fund manager Canada Pension Plan Investment Board (CPPIB) and IndoSpace, promoted by PE firm Everstone and US-based Realterm, have entered into a three-step deal which would entail an investment of $1.3 billion (₹8,320 crore), most of which will come from the CPPIB.

The two entities will set up a joint venture called IndoSpace Core to develop logistics facilities in the country. In the joint venture, the CPPIB will invest $500 million (₹3,200 crore) and get a majority stake.

As part of the deal, IndoSpace Core has the option to buy additional industrial and logistics parks, totalling 11 million square feet, currently being developed by IndoSpace and are worth about $700 million.

IndoSpace Fund III, floated by Indospace, would get an additional $100 million from the CPPIB as part of the new $650-million fund to develop more industrial and logistics parks in the country, sources said.

IndoSpace is a developer and investor of industrial and logistics parks. IndoSpace Capital Asia will manage the new entity.

As part of the deal, IndoSpace Core will buy 13 industrial and logistics parks with a space of 14 million square feet from the current IndoSpace development funds.

The joint venture will acquire the first nine facilities totalling around 9 million square feet and the additional facilities within 24 months.

The properties are based in Chennai, Pune, Mumbai, Delhi, and Bengaluru.

Andrea Orlandi, managing director and head of real estate investments (Europe), CPPIB, said, "The strong fundamentals underlying the Indian manufacturing and retail sectors and growth in e-commerce, combined with the low stock of high-quality modern industrial real estate in the country, make this a compelling investment opportunity for a long-term investor like CPPIB. This joint venture gives us immediate scale and access to a significant development pipeline in a rapidly growing sector."

IndoSpace Core will also acquire stabilised assets from third parties across the country, both companies said. Sameer Sain, co-founder and managing partner, Everstone Group, said, "As the leading owner and developer of logistics and industrial spaces in India, IndoSpace is excited to partner with CPPIB, one of the premier owners of industrial real estate globally. The combination of our expertise and a strong macro backdrop, including Make in India, the GST (goods and services tax) rollout and growth in e-commerce, will provide significant opportunities for this JV."

THE DEAL DETAILS

- CPPIB to invest $500 mn for majority stake in a JV with IndoSpace
- The JV, IndoSpace Core, has the option to buy additional logistics parks for $700 mn
- IndoSpace to get an additional $100 mn from CPPIB as part of the new $650-million fund
- IndoSpace Core will buy 13 industrial and logistics parks with a space of 14 million square feet, from current IndoSpace development funds
- The joint venture will acquire the first nine facilities totalling around 9 million sq ft and the additional facilities within 24 months

Sources: Everstone, CPPIB

Colgate to step up herbal presence as competition grows

VIVEAT SUSAN PINTO & SHEETAL AGARWAL
Mumbai, 15 May

The country's largest oral care company, Colgate-Palmolive, will ramp up its herbal portfolio in the next few quarters.

It reported a three per cent decline in volume growth for the March quarter. While in line with Street estimates and lower than the 12 per cent decline in volume growth reported for the December 2016 quarter, this does not bode well for the company, analysts said.

The trend, says Sachin Bobade, analyst for fast-moving consumer goods at city-based brokerage Dolat Capital, appears to be in favour of companies pushing herbal oral care products.

"Patanjali has been growing its share in oral care, according to its statements recently, where it said it had achieved market share of 14-15 per cent share in toothpastes. Dabur has seen a share gain of one per cent (110 basis points) for the March quarter, indicating there is traction for its products, which are based on Ayurveda.

Colgate, on the other hand, saw market share fall sequentially from 55.6 per cent in the December quarter to 55.1 per cent in the March one," he says.

In an analyst call on Monday to discuss its March quarter results, Colgate's management said Cibaca Vedshakti, a herbal toothpaste it launched in August 2016, would not be the last thing in its naturals portfolio.

"So far, Vedshakti has been doing well. Soon, we will see other naturals products from Colgate as we continue to innovate in the category," the management said.

Colgate has been working on its naturals portfolio for nearly two years. It first responded to the herbal revolution, kicked off by Patanjali, in June-July of 2015 when it launched Active Salt Neem toothpaste, its first indigenously developed one. Following with launches containing clove oil and charcoal, respectively.

The year 2016 saw the company launch its second indigenously developed toothpaste in Cibaca Vedshakti, with additional ones supporting its clove oil portfolio (sensitive clove toothpaste). But, for all the effort in the herbal category, the overall toothpaste share for Colgate has declined 220 basis points in the past year and three months, analysts said.

The management said told analysts on Monday that it would continue to see pressure on stocks in wholesale channels, due to the impending goods and services (GST) tax, leading to softness in volume growth and market share.

'We will invest $1 bn this year'

Q&A *TOM ALBANESE, chief executive officer of Vedanta and London-listed Vedanta Resources, is optimistic that good days for metal and oil companies are finally here. Soon after the FY17 results, he spoke to **Aditi Divekar & Dev Chatterjee** on the road ahead, after merger with oil producer Cairn India. Edited excerpts:*



The company performed better than expected in FY17, mainly due to a rally in metal prices and a special dividend announced by Hindustan Zinc. How do you see the company performing in the coming year?

The company has done well in the March quarter, better than expected by the analysts. The reaction in the stock markets is reflecting that. The gross debt has reduced by ₹400 crore during the year and net debt to Ebitda (earnings before interest, tax, depreciation and amortisation), at 0.4, is the lowest and strongest among Indian and global peers. The return on capital employed is now 14 per cent and if we continue the same growth trajectory this financial year, it would cross 20 per cent. The good performance is mainly due to ramp-up in production, focus on cutting debt and very good performance by Hindustan Zinc (HZL).

In the current financial year, we plan to invest $1 billion – mainly in HZL, our zinc facility in South Africa and about $250 million in Cairn India.

For the past few years, Vedanta has been keen to pick up the residual stake in both Balco (Bharat Aluminium) and in HZL. With the government planning to disinvest its shares, do you see any movement in this regard?

We have not received any indication that they would like to sell their shares in these companies. The government has been a very good partner for us in these two and even if they remain invested, it's okay with us.

Your Lanjigarh project in Odisha is operating at almost half its capacity. How do you plan to resolve the crisis, to get cheap bauxite?

The plant is meeting its bauxite requirements from (state-owned) Odisha Mining Corporation and from other states and imports. We realised the bauxite from other states is not of good quality. Lanjigarh is operating at a far lower level, not in the national interest, apart from failing to create new jobs in the region. We are in continuous dialogue with the Odisha government to get better quality bauxite from other sites. The government has realised that access to raw material is important for the company and is taking steps.

How do you plan to deleverage your balance sheet, with the ₹71,569 crore of gross debt as on March this year?

The cash generated in this quarter is equivalent to our Ebitda and after the Cairn merger, we will have about ₹48,000 crore of liquidity. This is strong enough to make an opening and with this we plan smart capital allocation. A part of this would be used to deleverage high-cost debt, where interest is above 9-10 per cent. Another portion would be allocation for growth in certain businesses and the third would be return-to-shareholders via an investor-friendly dividend policy. This will bring us in line with other global companies and make us an Indian multinational mining company.

Vedanta Q4 net profit jumps to ₹2,971 cr

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, 15 May

Metal and mining conglomerate Vedanta on Monday saw its consolidated net profit jump over threefold to ₹2,971 crore for the fourth quarter to March on the back of higher income.

The company had clocked a net profit of ₹861 crore (before exceptional items and dividend distribution tax) for the fourth quarter of 2015-16. Its total sales grew 41 per cent to ₹22,871 crore during the quarter under review as against ₹15,828 crore a year ago.

"Revenue in the fourth quarter was up... 41 per cent from a year ago, driven by higher sales volumes from Zinc India, supported by ramp-up at the aluminium and power business and improved metal and oil prices. Additionally, higher volumes at iron ore in Q4FY17 over Q4FY16 aided higher revenues," the company said in a statement.

परेवरील प्रवाशांसाठी खुशखबर
रेल्वेमंत्री आज करणार विविध सुविधांचे लोकार्पण

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी): पश्चिम रेल्वेने प्रवास करणाऱ्या मुंबईकरांसाठी खुशखबर आहे. कारण या मार्गावरील स्थानकांत आता स्कायवॉक, नव्या लिफ्ट, सरकते जिने, एलिव्हेटेड डेक, पादचारी पूल, बुकिंग कार्यालय, प्रवासी आरक्षण केंद्र, शौचालय या सुविधांची उभारणी करण्यात आली आहे. मंगळवारी बोरिवली स्थानकात रेल्वेमंत्री सुरेश प्रभू व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या सेवांचे लोकार्पण करणार आहेत.

पश्चिम रेल्वे स्थानकांवर एमआरव्हीसीकडून प्रवासी सुविधांचे काम वेगाने पूर्ण करण्यात आले. पश्चिम रेल्वेवरील वर्दळीचे स्थानक म्हणून बोरिवली स्थानकाचे नाव घेतले जाते. या स्थानकातून दररोज ३ ते ४ लाख प्रवासी प्रवास करतात. लांब पल्ल्यांच्या

गाड्यांच्या थांब्यासाठीदेखील बोरिवली स्थानक महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने प्रवासी सुविधा उद्घाटनाचा श्री गणेशा याच स्थानकातून होणार आहे.

रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी प्रवासी सुविधांवर भर देण्यात येईल, असे अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केले होते. त्यानंतर, उपनगरीय स्थानकांवर प्रवासी सुविधांच्या कामाचा सपाटा लावण्यात आला होता.

पश्चिम रेल्वेवर सुमारे ३५ लाख प्रवासी प्रवास करतात. यापैकी ७.५ लाखांहून अधिक महिला प्रवासी आहेत. या सुविधांमुळे महिला प्रवाशांना विशेष लाभ मिळणार आहे. एकूणच सध्या प्रवासी सुविधा कामांच्या पूर्णत्वामुळे तूर्तास पश्चिम रेल्वेवरील

रुग्णसेवेचा दर्जा वाढवा! देवेंद्र फडणवीस यांचे आदेश

खाटांच्या प्रमाणात मनुष्यबळ निर्मिती करण्याचे आदेश

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी): राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांमध्ये रुग्णसेवेचा दर्जा वाढविण्यासाठी तेथील उपलब्ध रुग्णखाटांच्या प्रमाणात अध्यापक वर्ग व विद्यार्थी संख्या वाढविण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच यासंबंधीचा कृती अहवालही येत्या तीन महिन्यांत सादर करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला केली.

वैद्यकीय शिक्षण संचालनालयातर्फे राज्यातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अध्यापकांची पदे निर्माण करताना संबंधित महाविद्यालयांतील केवळ विद्यार्थी संख्याच विचारात घेतली जाते. ही विद्यार्थी संख्या ठरविताना संबंधित वैद्यकीय महाविद्यालयात आवश्यक रुग्णखाटांचे किमान प्रमाण भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने ठरवून दिले आहे. मात्र राज्यात बहुतांश शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने ठरवून दिलेल्या रुग्णखाटांपेक्षा कितीतरी जास्त खाटा उपलब्ध असून त्या सर्व रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते. पर्यायाने अतिरिक्त रुग्णखाटांची सेवा करताना डॉक्टरांवर, वैद्यकीय विद्यार्थ्यांवरही ताण येतो. रुग्णसेवेच्या दर्जावरही

याचा परिणाम होतो. त्यामुळे रुग्णसेवेचा दर्जा वाढविण्याबरोबरच डॉक्टरांवरील ताण कमी करण्यासाठी मनुष्यबळ वाढविण्याची सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. यामुळे आता अध्यापक डॉक्टरांवरील कामाचा ताण कमी होऊ शकणार असून उपलब्ध सोईसुविधांचा पूर्ण क्षमतेने उपयोग होऊ शकेल. तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची संख्या वाढविणेही यामुळे शक्य होणार आहे.

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे निकष व परिस्थिती

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांत एक हजार रुग्णखाटा असल्यास तेथे २०० विद्यार्थी संख्या असे प्रमाण आहे. प्रत्यक्षात २०० एमबीबीएस विद्यार्थी संख्या असलेल्या नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १४०० रुग्ण खाटा, पुण्याच्या बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत १२९६ तर मुंबईतील ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तब्बल २८९५ रुग्णखाटा आहेत. या व अशा अनेक ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता असून याबाबत कृती अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

कामगारांच्या तक्रार नोंदणीसाठी वेबपोर्टल

संभाजी पाटील-निलंगेकर यांची घोषणा

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी): राज्यातील संघटित, असंघटित कामगारांच्या तक्रार नोंदणीसाठी आणि किमान वेतनाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाचा कामगार विभाग लवकरच एक स्वतंत्र ऑनलाईन वेबपोर्टल सुरू करणार असल्याची घोषणा कामगार मंत्री संभाजी पाटील-निलंगेकर यांनी केली. आज मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

महाराष्ट्रातील कोणत्याही भागातील कामगारविषयक तक्रार नोंदविण्यासाठी आणि त्यांच्या किमान वेतनाचा हक्क त्यांना प्राप्त करून देण्यासाठी सुरू करण्यात येणाऱ्या या वेबपोर्टलवर तक्रार करणाऱ्या कामगारांच्या अधिकारांना संरक्षण देण्यात येईल. तसेच तक्रार केलेल्या कामगाराला कामावरून आगाऊ सूचना न देता काढता येणार नाही, अशीही तरतूद करण्यात येईल. या सर्व तक्रारींचा साप्ताहिक अहवाल स्वतः मंत्री संभाजी निलंगेकर यांच्या कार्यालयाला देणे आवश्यक करण्यात येणार असून त्याची एक प्रत कामगार विभागाच्या प्रधान सचिवांनाही पाठविण्यात येईल.

या वेबपोर्टलच्या अंमलबजावणीसाठी एक समिती नेमण्यात येणार असून कामगार विभागाचे आयुक्त हे या समितीचे प्रमुख असतील. तसेच विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधीही या समितीमध्ये सदस्य असतील.

थोडक्यात

फेरीवाल्यांवर धडक कारवाई

मुंबई : मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३१४ च्या तरतुदीनुसार व प्रचलित धोरणानुसार दि.१ मे, ते दि. ६ मे, दरम्यान अतिक्रमण निर्मूलन पथकांनी उपायुक्त (अतिक्रमण निर्मूलन) रणजित ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली उप अनुज्ञापन अधीक्षक, सुरक्षा खात्याचे अधिकारी व मुंबई पोलीस यांच्या मदतीने बृहन्मुंबई महानगरपालिका एच/पश्चिम विभागातील वांद्रे एस. व्ही. मार्ग व जोडरस्ता जंक्शन; नंदी गल्ली, वांद्रे (पश्चिम); टर्नर रोड, वांद्रे तलाव, खार बाजार, खार स्थानक रस्ता, सांताक्रुझ स्थानक रस्ता, ३३ वा रस्ता, १४ व्या रस्त्यासमोर आणि पाली हिल रोड अशा एकूण ८९ अनधिकृत फेरीवाले व खाद्यपदार्थ विक्रेते यांच्याविरुद्ध धडक कारवाई केली.

कृष्णा बोरकर यांचे निधन

मुंबई : जेष्ठ रंगभूषाकार कृष्णा बोरकर यांचे आज दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. गेली सत्तर वर्षांहून अधिक वर्षे नाट्यव्यवसायात रंगभूषेची धुरा समर्थपणे सांभाळणारे रंगभूषाकार कृष्णा बोरकर यांचे आज संध्याकाळी मूत्रपिंडाच्या विकाराने मुंबईत निधन झाले. वयाच्या अकराव्या वर्षापासून रंगभूषाकार म्हणून बोरकर यांचा प्रवास सुरू झाला. वयोपरत्वे रंगभूषेच्या कामातून निवृत्ती पत्करल्यानंतर ते मुंबई विद्यापीठाच्या अकॅडमी ऑफ थिएटर आर्टसच्या अभ्यासक्रमात रंगभूषा हा विषय प्रात्यक्षिकासह शिकवण्याचे काम ते करत. बोरकर कुटुंबीय खरे तर गोव्यातील बोरी गावचे. पण पोर्तुगीजांच्या काळात काही मंडळींनी तिथून स्थलांतर केले आणि बोरकर रत्नागिरी जिल्ह्यातील चिंचखरी गावी आले.

मेडिको दुहेरी विकेट स्पर्धा संपन्न

मुंबई: डॉ. प्रकाश वझे क्रीडा प्रतिष्ठान आयोजित नववी मेडिको दोन षटकांची खुली दुहेरी विकेट स्पर्धा रविवार दि. १४ मे रोजी ऑर्किनस फॅक्टरी स्पोर्ट्स अंबरनाथ येथे यशस्वीरित्या संपन्न झाली. यामध्ये अंतिम सामन्यात मुलुंडचे डॉ. रोशन कोल्हे आणि अंधेरीचे डॉ. अक्षय लुळे या दंतशल्यकांच्या जोडीने धुवाधार फलंदाजी करत भांडुप मेडिकोच्या डॉ. कवल यादव आणि डॉ. सुधीर या जोडीचा (२६-०६) असा दणदणीत पराभव करून मेडिकोच्या क्रिकेटमधील अत्युच्च मानाची नववी मेडिको दुहेरी विकेट स्पर्धा जिंकली. दिनार पाठक या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

पुण्याजवळ गुलाब पाकळ्यांपासून पहिल्या वाईन निर्मिती प्रकल्पाला मंजुरी

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी): राज्यातील शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून शाश्वत उत्पन्नाचे साधन देण्यासाठी राज्य सरकारने वेगवेगळ्या उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिले आहे. मात्र आता राज्य सरकारने गुलाबाच्या पाकळ्यांपासून वाईन निर्मिती करण्याच्या देशातील पहिल्यावहिल्या प्रकल्पाला पुण्याजवळ प्रायोगिक तत्त्वावर मंजुरी दिली आहे.

जयश्री यादव यांच्या या प्रकल्पाचा खर्च ३१.८० लाख रुपये आहे. आतापर्यंत राज्यात द्राक्ष, चिकू, जांभूळ अशा फळांपासून वाईन निर्मिती केली जात आहे. मात्र फुलांच्या खोड, पाने, फुले यांचा वापर करत नैसर्गिक पदार्थांपासून वाईन निर्मिती करण्याबाबत पहिल्यांदाच प्रयोग केला जात असून त्यात कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या होत्या. असे राज्याचे उत्पादनशुल्क मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

राज्याच्या विधी आणि न्याय विभागाने अदर सबस्टन्सपासून वाईन निर्मिती करण्याच्या प्रस्तावातील शब्दाला हरकत घेतल्याने हा प्रकल्प खोळंबला होता. मात्र या उद्देशाला बगल न देता राज्य सरकारने हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यास नुकतीच मान्यता दिली आहे. अशी माहिती राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. पुण्यातील जयश्री यादव यांनी गुलाब फुलांच्या पाकळ्यांपासून वाईननिर्मिती करण्याचे पेटंट मिळवले असूनही गेली कित्येक वर्षे याबाबतचा प्रस्ताव सरकारदरबारी प्रलंबित होता. मात्र त्यावर राज्यात नवे सरकार आल्यानंतर कार्यवाही करण्यात आली आणि या प्रकल्पाला पायलट म्हणजे प्रायोगिक तत्त्वावर मान्यता देण्यात आली आहे.

हा प्रकल्प यशस्वी झाल्यास राज्य सरकारला नव्या उत्पन्नाचा तसेच रोजगाराच्या संधी मिळणार आहेत.

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प

बुधवारपासून सुरू होणार सर्वेक्षणाचे काम

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी): नायगाव व ना. म. जोशी मार्गावरील बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी येत्या १७ मे पासून सर्वेक्षणाचे काम सुरू होणार आहे. त्यासाठी १३ जून १९९६ च्या वास्तव्याचा पुरावा ग्राह्य धरला जाणार आहे. सर्वेक्षणाच्या काळात घरात मूळ मालक असणे आवश्यक असल्याची अट घालण्यात आली आहे.

राज्य सरकारने बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. पहिल्या टप्प्यात नायगाव व ना. म. जोशी मार्गावरील चाळींचा पुनर्विकास होईल. त्याची सुरुवात रहिवाशांची पात्रता तपासण्याच्या कामाने होणार आहे. येत्या बुधवारी सकाळी दहा वाजल्यापासून रहिवाशांची पात्रता तपासण्याचे काम सुरू होणार आहे. त्यावेळी रहिवाशांनी भाडेपावती, वीजदेयके, निवडणूक ओळखपत्र आदी वास्तव्याचे पुरावे सादर करावे, असे आवाहन बीडीडी चाळी पुनर्वसन प्रकल्पाच्या सक्षम अधिकारी अंजली भोसले यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध करून केले आहे. पात्रता सिद्ध करण्यासाठी १३ जून १९९६ व त्यापूर्वीच्या वास्तव्याचा पुरावा आवश्यक आहे. मुख्य म्हणजे सर्वेक्षणाच्या काळात घर बंद असल्यास तशी नोंद सर्वेक्षण अहवालात केली जाईल. त्यामुळे या काळात घर बंद राहणार नाही, याची काळजी घरमालकाने घेणे आवश्यक आहे, असेही नमूद केले आहे.

हे सर्वेक्षण बायोमेट्रिक पद्धतीने होणार आहे. म्हणजे मूळ मालकाच्या हाताचे ठसे स्कॅन होतील. फोटोही स्कॅन केले जातील. त्यामुळे मूळ मालकाने हजर असणे आवश्यक आहे, असे नोटिशीत नमूद केले आहे. पण सध्याच्या सुट्टीच्या काळात अनेक रहिवासी मुंबईबाहेर गावी गेले आहेत. त्यामुळे मूळ मालकाला मुंबईत धाव घ्यावी लागेल, अन्यथा सर्वेक्षणाच्या काळात घर बंद असल्यास पुढे अडचणी निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे रहिवाशी संभ्रमात आहेत.

अपघातग्रस्तांना मिळणार शासकीय मदत

वेळेवर उपचारांसाठी राज्यशासन देणार ३० हजार रु.

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी): राज्यासह सर्वत्रच दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढत आहे अशा वेळी अनेकदा जखमींना वेळेवर उपचार मिळत नाही. त्यामुळे अपघातात जखमी झालेल्यांना आपला जीवही गमवावा लागतो. त्यामुळे अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार मिळावेत म्हणून राज्य सरकारने ३० हजार रुपये खर्च देण्याची योजना आखली आहे. अपघात झाल्यानंतर ४८ तासात जखमींवर उपचारासाठी होणारा खर्च आता राज्य सरकार अपघातग्रस्त व्यक्तीला देणार आहे. यामुळे अपघातग्रस्तांना या योजनेचा फायदा होणार आहे. ही योजना येत्या तीन महिन्यांत लागू होणार असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. या योजनेचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे विमा कवच' असे या योजनेला नाव देण्यासाठी सरकार सकारात्मक असल्याचेही वृत्त आहे.

महापालिकेने १ लाख २० हजार किलो बर्फ जप्त करून केला नष्ट

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी): महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याद्वारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणादरम्यान महापालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांकडील सरासरी ७५ टक्के बर्फ नमुन्यांमध्ये इ-कोलाय जीवाणू आढळून आले होते. तसेच एप्रिल महिन्यात महापालिका क्षेत्रातील काही भागात अतिसाराचे रुग्णदेखील आढळून आले होते. या पार्श्वभूमीवर अनधिकृत फेरीवाले / सरबत विक्रेते / खाद्यपदार्थ विक्रेते यांच्यावरील कारवाई यापूर्वीच अधिक तीव्र करण्यात आली आहे. यानुसार गेल्या काही दिवसात सर्व २४ विभागांमध्ये सुमारे १ लाख २० हजार किलो बर्फ जप्त करून नष्ट करण्यात आला आहे, अशी माहिती महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याद्वारे देण्यात आली आहे.

या कारवाई दरम्यान महापालिकेच्या 'एम पूर्व' विभागात सर्वाधिक म्हणजे १८ हजार ५०० किलो एवढा बर्फ जप्त करून नष्ट करण्यात आला आहे. या खालोखाल महापालिकेच्या 'आर दक्षिण' विभागामध्ये सुमारे ११ हजार किलो बर्फ जप्त करून नष्ट करण्यात आला आहे.

मुंबईतील गगनचुंबी इमारतींमुळे पावसाला अडथळा?

आयआयटीच्या अभ्यासातील माहिती

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी): मुंबईत उभारल्या जाणाऱ्या गगनचुंबी इमारती या पावसाला अडथळे ठरत असल्याचे मुंबई आयआयटीने केलेल्या अभ्यासातून समोर आले आहे. यासोबत उंचच उंच इमारतींमुळे मान्सूनचा अचूक अंदाज बांधणेदेखील अवघड होत असल्याचे निरीक्षणदेखील नोंदविण्यात आले आहे. या अभ्यासासाठी ऑटोमॅटिक वेदर स्टेशनच्या माहितीचा आधार घेण्यात आला. त्यामुळे मान्सूनचा अंदाज बांधण्याच्या पद्धतीत बदल करण्याची गरज आयआयटीकडून व्यक्त करण्यात आली आहे. सध्या भारतीय हवामान खाते सांख्यिक सांख्यिकी अंदाज प्रणालीचा वापर करून हवामानाच्या अंदाजाची माहिती देते.

मुंबई आयआयटीच्या सहा सदस्यीय टीमने ऑटोमॅटिक वेदर स्टेशनच्या माहितीचा सखोल अभ्यास केला आहे. ऑटोमॅटिक वेदर स्टेशन्स २००५ मध्ये मुंबईत आलेल्या पुरानंतर उभारण्यात आली. २६ जुलै २००५ रोजी मुंबईत तब्बल ९४४ मिलीमीटर इतका पाऊस झाला होता. दरवेळच्या पर्जन्यमानात एकसारखेपणा नसल्याचे प्रमाण वाढले आहे. यासोबतच रात्रीच्यावेळी पडणाऱ्या पावसाचे प्रमाण आणि पावसाचा जोर दिवसाच्या तुलनेत अतिशय कमी आहे. पर्जन्यमानात झालेले हे बदल टिपण्याचा यंत्रणेची निर्मिती लवकरात लवकर करणे आवश्यक आहे. त्यामुळे धोरणे आखण्यासाठी मदत होईल, असे मुंबई आयआयटीच्या टीमने निरीक्षणांतर म्हटले.